कर्मचारीवर्ग खाते
परिपत्रक क्रमांक २३ /१९९४.

क्र. राप/आस्था/मागा-२/ ५९०२.
म. रा. मा. प. महामंडळ, मध्यवर्ती कार्यालय,
महाराष्ट्र वाहतूक भवन, डॉ. आनंदराव नायर मार्ग,
मुंबई-४०० ००८. दिनांक : ८ .११. १९९४.

प्रादेशिक व्यवस्थापक,
रा. प. महामंडळ, मुंबई / पुणे / औरंगाबाद / नागपूर / नाशिक / अमरावती.

कार्यशाळा व्यवस्थापक,
रा. प. महामंडळ, मध्यवर्ती कार्यशाळा, दापोडी, पुणे/औरंगाबाद/नागपूर.

व्यवस्थापक [प्रशिक्षण],
रा. प. महामंडळ, मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था, भोसरी, पुणे/

विभाग नियंत्रक,
रा. प. महामंडळ, मुंबई / धुळे / जळगांव / नाशिक / पालघर/ रायगड[पेण] / रत्नागिरी / सिंधुदुर्ग / ठाणे / पुणे / अहमदनगर / कोल्हापूर / सांगली / सातारा / सोलापूर / औरंगाबाद / बीड / जालना / लातूर / नांदेड / उस्मानाबाद / परभणी / नागपूर / अकोला / अमरावती / भंडारा / बुलढाणा / चंद्रपूर / वर्धा / यवतमाळ.

विषय :- मंडल आयोगाने केलेल्या शिफारशी नुसार इतर मागासवर्गीय व विमुक्त जाती व भटक्या जमातींना राज्य परिवहन सेवेत सुधारीत आरक्षण.

....

वरील विषयाबाबत महाराष्ट्र शासनाचे गृह विभागाचे पत्र क्र. एसटीसी-०१९४/८८४/परिवहन-१, दिनांक १० जून १९९४ ची प्रत व त्यासोबत शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र. बीसीसी-१०९३/२१६७/सीआर-१४१/९३/१६-ब दिनांक २३ मार्च १९९४ ची माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी सोबत जोडली आहे. या शासन आदेशाची नोंद घेऊन त्यानुसार अंमलबजावणी करण्यात यावी.

मंडल आयोगाच्या शिफारशी नुसार इतर मागासवर्गीयांकरिता तसेच विमुक्त जाती व भटक्या जमातींकरिता जे सुधारीत आरक्षण विहीत केले आहे त्याची अंमलबजावणी शासन निर्णयाच्या दिनांका पासून म्हणजेच २३ मार्च १९९४ पासून अंमलात राहील.

सध्या महामंडळामध्ये शासनाच्या आदेशानुसार मागासवर्गीयांचा दिनांक ३१. ७. १९९३ चा १०० टक्के अनुशेष भरून काढण्याबाबत खास भरतीमोहिम कार्यरत आहे. म्हणूनच या अनुशेष भरतीसाठी वरील सुधारित आरक्षण लागू होणार नाही. या अनुशेषाच्या भरती व्यतिरिक्त जेव्हा महामंडळामध्ये सर्वसामान्य भरती करण्यात येईल त्यावेळी मागासवर्गीयांचा आरक्षणाचा विचार करताना वरील सुधारित आरक्षण लागू करण्यात यावे.

इतर मागासवर्गीयांकरिता व विमुक्त जाती व भटक्या जमातींकरिता शासनाने जे सुधारित आरक्षण विहीत केले आहे. त्यासाठी आपण शासनाच्या निर्णयानुसार १०० बिंदू नामावली ऐवजी २०० बिंदू नामावली नोंद वह्या ठेवावयाच्या आहेत या बाबतचा शासन निर्णय क्र. बीसीसी-१०९३/२१६७/सीआर-१४१/९३/१६-ब, दिनांक १८ जून १९९४ सोबत पाठविण्यात येत आहे. या शासन निर्णयाची त्वरीत काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी.

..२..